सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ४८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १० मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## महाराष्ट्रात ५ वर्षांत ७१ लाख रोजगार : नव्या औद्योगिक धोरणातून ५० लाख रोजगार तयार होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत आपला ११ वा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी त्यांनी अनेक महत्त्वाच्या घोषणा केल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला.

'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.

आगामी काळात महाराष्ट्रात ७१ लाख ७ हजार ५०० इतकी रोजगार निर्मिती होईल, असा आशावाद सोमवारी अर्थमंत्री अजित पवार यांनी आपल्या अर्थसंकल्पातून व्यक्त केला. दावोस गुंतवणुकीतून सुमारे १६ लाख, महाराष्ट्राचे महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक २०२५ मधून ५० लाख, तर लॉजिस्टिक धोरणातून ५ लाख आणि गडचिरोली जिल्ह्यातल्या स्टील हबमधून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होईल, असे पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले, गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे.

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा तयार करण्यात आला.

### अर्थसंकल्पातून अजित पवारांचा आशावाद




या कृती आराखड्यात संकेतस्थळांचा विकास, सुलभ जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयीसुविधा, गुंतवणुकीचा प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदींचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमामुळे प्रशासन कार्यक्षम, पारदर्शक, गतिशील, लोकाभिमुख होऊन राज्य प्रगतीच्या शिखरावर जाईल, याची खात्री आम्हाला आहे.

या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थांकडून करवून घेऊन उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम निरंतर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०२५ लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. त्या धोरणाच्या ५ वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट असेल. नवीन औद्योगिक धोरणाबरोबरच अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण, इलेक्ट्रॉनिक्स धोरण, जेम्स न्ड ज्वेलरी धोरण, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरण, चक्रीय अर्थव्यवस्थेसाठी स्वतंत्र क्षेत्रीय धोरण जाहीर करण्यात येणार आहेत.

सन २०२३-२४ मध्ये एकूण ५ लाख ५६ हजार ३७९ कोटी रुपयांची व सन २०२४-२५ मध्ये नोव्हेंबर, २०२४ पर्यंत ३ लाख ५८ हजार ४३९ कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करण्यात आली आहेत. राज्याचे लॉजिस्टिक धोरण-२०२४ जाहीर करण्यात आले असून त्याद्वारे १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. प्रकल्पांना देऊ केलेल्या विशेष प्रोत्साहन व सुविधांमुळे सुमारे ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे.

एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात असून त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. समतोल प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये ६ हजार ४०० कोटी रुपये प्रोत्साहन अनुदान प्रस्तावित आहे.

**मुंबईतील वाहतूक गतिमान होणार : अजित पवार**

अर्थमंत्री म्हणाले, मुंबई उपनगरातील वाहतूक गतिमान व्हावी यासाठी वर्सोवा ते मढ, वर्सोवा ते भाईंदर किनारी मार्ग, मुलुंड ते गोरेगाव, ठाणे ते बोरीवली आणि ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग असे ६४ हजार ७८३ कोटी किमतीचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा उन्नत मार्ग बांधण्याचं नियोजन असून त्याद्वारे ठाणे, डोंबिवली, कल्याण व इतर महत्त्वाची शहरं विमानतळाशी जोडली जाणार आहेत. तसेच, बाळकुंभ ते गायमुख या ठाणे किनारी मार्गाची लांबी १३.४५ किमी असून त्याचे ३,३६४ कोटींचे खर्चाचे काम २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

## ३१ मार्च पासून अमरावतीतून विमानसेवा सुरू होणार? अर्थसंकल्पातील घोषणेमुळे नागरिकांमध्ये आनंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

येथील बेलोरा विमानतळाचे काम पूर्ण झाले असून ३१ मार्च २०२४ पासून प्रवासी विमानसेवा सुरू करण्याचे सरकारचे नियोजन आहे, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात केल्यानंतर अमरावतीत आनंद व्यक्त केला जात आहे.अमरावती विमानतळावर नुकतीच 'एअर कॅलिबरेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर' अर्थात 'पीएपीआय' चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यामुळे अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावती




विमानतळावरून विमान उड्डाण करण्यासाठी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) परवानगी मागण्यात आली आहे.

ही परवानगी आल्यानंतर इथून नियमित विमान उड्डाण सुरू होईल. दरम्यान, अमरावती विमानतळ सुरू झाल्यानंतर त्याअनुषंगाने या भागात उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. येत्या ३१ मार्चपासून प्रवासी विमानसेवा सुरू होण्याचे संकेत अर्थमंत्र्यांनी दिल्याने आता अमरावतीकरांचे विमानसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. अर्थमंत्र्यांच्या घोषणेचे स्वागत करण्यात येत आहे.

अमरावती विमानतळावर नवीन धावपट्टी तयार करण्यात आली आहे. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. १८ बाय ५० मीटरची ही धावपट्टी आहे. त्यामुळे येथून एटीआर हे ७२ आसनी विमान उडू शकणार आहे.हवाई वाहतूक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली बंगळुरूहून अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर उड्डाण केलेल्या बीच एअर ३६० ईआर टर्बोप्रॉप विमानावर भारतीय विमानतळ प्राधिकरण, फ्लाइट इन्स्पेक्शन युनिटने कॅलिब्रेशन केले. या विमानाने २६/०८ धावपट्टीवरून अमरावती विमानतळावरून उड्डाण केले आणि त्याचे कॅलिब्रेशन यशस्वीरित्या पूर्ण केले. पॅसेंजर टर्मिनल बिल्डिंग, एटीसी टॉवर्स आणि इतर नागरी कामे पूर्ण झाली असून, अमरावतीहून लवकरच पूर्ण व्यावसायिक उड्डाणे सुरू होण्यापूर्वी गेल्या काही सुरक्षाविषयक तपासण्या केल्या जात आहेत. प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजनेअंतर्गत मुंबई-अमरावती-मुंबई मार्गावर अलायन्स एअर या कंपनीच्या माध्यमातून एटीआर ७२ आसनी विमान सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.या विमानतळावर 'पीएपीआय' प्रणाली बसवण्यात आली आहे. विमान वाहतुकीच्या सुरक्षिततेसाठी ते एक आवश्यक साधन मानले जाते. धावपट्टीजवळ येणारी विमाने जवळ येताना आणि सुरक्षित लँडिंगसाठी योग्य ग्लाइड उतार राखण्यासाठी ते आवश्यक आहे. 'पीएपीआय' प्रणालीचे कॅलिब्रेशन विमानतळाच्या पायाभूत सुविधांचा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. ते आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सुरक्षा मानकांनुसार करण्यात आले आहे.

## देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत केलं भारतीय संघाचे कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

भारतीय क्रिकेट संघाने दुबई येथे पार पडलेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा चार गडी राखून पराभव केला. या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय संघाचे भरभरून कौतुक केले जात आहे. यादरम्यान आज विधानसभा अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय क्रिकेट संघाच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.

भारताच्या ऐतिहासिक विजयाबद्दल विधानसभा सभागृहात बोलताना फडणवीस म्हणाले की, सर्वांसाठी कालचा दिवस ऐतिहासिक आहे, कारण आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफिमध्ये पुन्हा आपलं वर्चस्व सिद्ध करत ही ट्रॉफि जिंकली आहे. ही आपल्यासाठी अभिमानाची बाब




आहे. यानिमीत्ताने संघाचे कर्णधार रोहित शर्मा, प्रशिक्षक गौतम गंभीर यांचं मनापासून अभिनंदन करूया. कॅप्टन रोहित शर्मा यांच्या नेतृत्वात टीमने प्रचंड मेहनत केली आणि शेवटच्या सामन्यात ज्या प्रकारे रोहित शर्मा खेळले आणि ज्या प्रकारे त्यांनी आपली नेहमीची शैली बदलून, मध्ये वेगाने मधेच स्थैर अशा प्रकारे पीचवर टिकून ७६ धावा काढल्या या ७६ धावाच सामन्याच्या निर्णायक धावा होत्या.

**रोहित-विराटच्या खेळीचे विशेष कौतुक**

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या फॉर्मबाबत झालेल्या टीकेबद्दल बोलताना फडणवीस म्हणाले की, या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सुरूवातीला अनेक टीकाकार रोहित शर्मा, विराट कोहली यांच्याबाबत बोलत होते. त्यांच्या फॉर्मबद्दल चर्चा होत होती, पण फॉर्म हा टेंपररी असतो, क्लास परमनंट असतो हे या दोघांनी दाखवून दिलं. ज्या प्रकारची क्लासी बॅटिंग रोहित शर्मा आणि त्या आधीच्या सामन्यात विराट कोहली यांच्याकडून पाहायला मिळाली, त्यामध्ये त्यांनी दाखवून दिलं की ते अनुभवी आणि यंग असेच बॅट्समन ते आहेत.वरूण चक्रवर्ती या खेळाडूचं मला विशेष कौतूक करावं वाटतं. आपल्या शालेय जीवनात ते क्रिकेट खेळले आहेत, पण त्यानंतर ते आर्किटेक झाले. थोडं क्रिकेटशी नातं तुटलं. काही दिवस नोकरी केली. पण त्यांच्या रक्तात क्रिकेट होतं, पुन्हा क्रिकेटकडे वळले आणि आज त्यांच्या फिरकीपुढे सगळे नेस्तनाबूत झाले, असे फडणवीस म्हणाले.

## 'संपूर्ण देशात मतदार यादीवर संशय, चर्चा व्हायला हवी', राहुल गांधींची लोकसभेत मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नवी दिल्ली**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून (१० मार्च) सुरू झाला आहे. ४ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात एकूण १६ बैठका होणार आहेत. या कालावधीत वक्फ कायद्यासह सुमारे ३६ विधेयके मांडण्याची तयारी सरकार करत आहे. दरम्यान, आज लोकसभेतील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीचा मुद्दा उपस्थित केला.

**मतदार यादीवर सभागृहात चर्चा आवश्यक**

विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले, संपूर्ण देशात आणि प्रत्येक विरोधी राज्यात मतदार यादीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. महाराष्ट्रासह प्रत्येक राज्यातील मतदार यादीत गडबड असल्याचा संशय व्यक्त



होतोय. या मतदार यादीवर सभागृहात चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

लोकसभा व्यतिरिक्त राहुल गांधी यांनी मतदार यादीबाबत द वर एक पोस्ट देखील केली आहे. त्यात त्यांनी लिहिले की, संपूर्ण विरोधी पक्ष संसदेत मतदार यादीवर सविस्तर चर्चा करण्याची मागणी करत आहेत. महाराष्ट्राच्या मतदार यादीतील अनियमिततेबाबत माझी पत्रकार परिषद होऊन एक महिन्याहून अधिक काळ झाला, मात्र पारदर्शकतेबाबत आम्ही निवडणूक आयोगाकडे केलेल्या मागण्या अद्याप पूर्ण झालेल्या नाहीत. प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. आता मतदार यादीतील दुबार नावांचे नवे पुरावे समोर आले असून, त्यामुळे नवे आणि गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी ही चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे, असेही राहुल म्हणाले.

## काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर आज शिवसेनेत करणार पक्षप्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०पुणे**

माजी आमदार रवींद्र धंगेकर हे अनेक दिवसांपासून काँग्रेस सोडणार असल्याची राजकीय चर्चा होती. ही चर्चा अखेर खरी ठरली आहे. माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी काँग्रेस सोडताना दु:ख होत असल्याचं म्हटलं आहे. काँग्रेसवर नाराजी नाही. पक्षानं मला भरभरून दिलं आहे. कार्यकर्त्यांची सत्तेत जाण्याची भावना असल्याचं त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.माजी आमदार रवींद्र धंगेकरांनी काँग्रेस सोडली आहे. त्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.



एकनाथ शिंदेंसह काम करण्याची मानसिकता झाली आहे. आज संध्याकाळी त्यांची सात वाजता भेट होणार आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे काहीही मागितलेलं नाही. सत्तेत असल्याशिवाय काम होत नाही, असे जनतेचं म्हणणं आहे. गेल्या ३५ वर्षात मला सत्तेचा लाभ मिळाला नाही. मला महापालिका निवडणूक लढवायची नाही, असेदेखील रवींद्र धंगेकर यांनी सांगितलं.रवींद्र धंगेकर यांनी गुरुवारी (३० जानेवारी) उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर ते शिवसेनेत जाणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. यावर स्पष्टीकरण देत 'ईटीव्ही भारत'शी संवाद साधत असताना रवींद्र धंगेकर यांनी वैयक्तिक कराणानं उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतल्याचं सांगितलं होतं. तसंच कुठंही जाणार नसल्याचं म्हटलं होतं.

## पंतप्रधान कार्यालयाने घेतली कृषी अवजार घोटाळ्याची दखल

### प्रत्येक महिला बचत गटाला मिळणार होते ८ लाख ७१ हजारांचे साहित्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नागपूर**

समाजकल्याण विभागातील कृषी अवजारे घोटाळ्याची दखल पंतप्रधान कार्यालयाने (पीएमओ) घेतली असून याची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे आता या प्रकरणावर कुणालाच पांघरूण घालता येणार नसल्याची चर्चा आहे.समाजकल्याण विभागामार्फत २०२१-२२ मध्ये जिल्ह्यातील १०० महिला बचत गटांसाठी कृषी अवजारे देण्याची योजना आखण्यात आली. यासाठी खनिज प्रतिष्ठानमधून ८ कोटी ७१ लाखांचा निधी मंजूर झाला होता. प्रत्येक महिला बचत गटाला ८ लाख ७१ हजारांचे साहित्य देण्यात येणार होते. परंतु उमरेड तालुक्यातील महिला बचत गटांना साहित्य मिळालेच नाही. पुरवठादाराने साहित्यच दिले नाही. हे साहित्य ९० टक्के अनुदानावर देण्यात आले होते. १० टक्के रक्कम भरल्यावर अनुदानाची रक्कम लाभार्थी बचत गटाच्या खात्यात टाकण्यात आली. अनुदानाची रक्कम लाभार्थी बचत गटांच्या खात्यात आल्यानंतर ती लगेच काढण्यात आल्याची माहिती समोर आली.




काही महिला बचत गटांचे प्रमाणपत्र संशयास्पद असल्याचे समोर आले. बचत गट बोगस तयार करण्यात आल्याची शंका व्यक्त करण्यात येत आहे. सर्व जिल्हाभर हा प्रकार झाल्याचा अंदाज आहे. प्राथमिक चौकशी अहवाल जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आला. परंतु त्यावरच काहीच झाले नाही. दरम्यान, खासदार श्यामकुमार बर्वे यांनी या घोटाळ्याची तक्रार पंतप्रधानांकडे केली. त्यानंतर पीएमओ कार्यालयाने संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

## संपादकीय ......

# स्थानिक स्वराज्य संस्था प्रशासकांच्या विळख्यात

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थानिक स्वराज्य संस्था लवकर व्हाव्यात यासाठी गावापासून शहरापर्यंत राजकीय व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे व सन २०२० पासून निवडणुका लढविण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून इच्छुक चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. किंबहुना या निवडणुकांसाठी त्यांनी आपल्या घरातील देव पाण्यात ठेवले आहेत अथवा देवाधिदेवांना नवसही करून थकले आहेत, असे म्हटले तरी ते सध्याच्या घडीला अतिशयोक्तीचे ठरणार नाही. कोरोना काळापासून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. कोरोना जाऊन आता तीन वर्षे लोटले तरी निवडणुका लवकर होण्याची चिन्हे सध्या तरी दिसत नाहीत. न्यायालयीन प्रक्रियेमध्ये सुनावणी अडकल्यामुळे महाराष्ट्राचा कारभार सध्या प्रशासकीय अधिकारी चालवत असल्याने गेल्या ५ वर्षांमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका, नगर परिषदा, महानगरपालिका, जिल्हा परिषदा या माध्यमातून होणारा स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार हा प्रशासनच चालवत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून प्रत्येक सुनावणीकडे राजकीय घटकाचे लक्ष लागलेले असते. या सुनावणीत तरी निकाल लागेल, या भोळ्याभाबड्या आशेवर निवडणूक लढवू पाहणारे घटक ही आशा ठेवून न्यायालयातील सुनावणीच्या घडामोडींवर नजरा ठेवून असतात. सुनावणीत पुढची तारीख मिळते आणि संबंधित इच्छुकांच्या पदरी निराशा पडते. आता ६ मे रोजी या प्रकरणी सुनावणी होणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या दिवाळीनंतरच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये त्या त्या जिल्हा परिषदा, महापालिका, नगरपालिका, पंचायत समित्या, नगर परिषदा यामध्ये प्रभाग संख्येनुसार ओबीसी आरक्षण किती असावे या प्रकरणावरून न्यायालयात सुनावणी सुरू असल्याने या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. राज्यातील २९ महानगरपालिका, २३२ नगरपालिका, सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, काही ठरावीक नगर पंचायतीमध्ये लोकप्रतिनिधींच्या सरकारचा कालावधी संपुष्टात असल्याने प्रशासकीय राजवट सुरू आहे. सनदी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून त्या त्या स्थानिक भागातील आस्थापनांचा कारभार चालविण्यात येत आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प देशातील काही छोट्या राज्यांच्या अर्थसंकल्पापेक्षाही मोठा आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकांसाठी सत्ताधाऱ्यांपासून विरोधकांपर्यंत सर्वच घटक मोर्चेबांधणी करून थकले आहेत. निवडणुका लांबणीवर पडत असल्या तरी निवडणुका लढवू पाहणाऱ्या इच्छुकांचा उत्साह तसूभरही कमी झालेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या याचिकेवर निकाल लागला तरी निवडणुका लगेच घेणे राज्य निवडणूक आयोगाला शक्य होणार नाही. मतदार याद्या अद्ययावत कराव्या लागणार आहेत. नव्याने दोन, तीन, चार प्रभागांच्या रचनेचा पॅनल बनवावा लागणार आहे. मुंबई महापालिकेचे २३६ प्रभाग करावे की २२७ प्रभाग करावे याबाबतही चित्र स्पष्ट झालेले नाही. ते चित्र स्पष्ट झाल्यावर निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाला किमान ९० दिवसांचा कालावधी लागणार आहे.

प्रभाग आरक्षणाबाबत न्यायालयाचा निकाल लागल्यावर नव्याने प्रभाग रचना करावी लागणार असून कोणते प्रभाग आरक्षित ठेवायचे याबाबत निवडणूक आयोगाला निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यातच काही महापालिकांमध्ये दोन प्रभाग, काहींमध्ये तीन, तर काहींमध्ये चार सदस्यीय प्रभाग रचना पॅनल नव्याने करावे लागणार आहे. हा गुंता सहजासहजी सोडविणे अवघड जाणार असून त्यासाठी निवडणूक आयोगाला काही कालावधी लागणार आहे. निवडणुका लांबणीवर पडल्याने लोकप्रतिनिधी बनण्यासाठी मोर्चेबांधणी करणाऱ्या राजकीय घटकांचे जितके नुकसान झाले आहे, त्याहून कैकपटीने अधिक नुकसान सर्वसामान्य जनतेचे झालेले आहे. आपल्याला हव्या असलेल्या अपेक्षित नागरी सुविधांसाठी आणि नागरी समस्या निवारणासाठी स्थानिक जनतेला लोकप्रतिनिधी आपल्या निवासी परिसरातच उपलब्ध होत असतो. त्यांना समस्यांचे व असुविधांचे गांभीर्य पटवून देणे सहज शक्य असते. प्रशासकीय राजवटीत स्थानिक नागरिकांना प्रशासकीय कार्यालयात जाऊन कागदी घोडे नाचवून समस्या, असुविधा प्रशासकीय सनदी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे लागते. सनदी अधिकाऱ्यांच्या दालनात आपल्या कामासाठी चपला झिजवाव्या लागत आहेत. कामासाठी टाहो फोडावा लागत आहे. सध्या सोशल मीडियाचा काळ असल्याने आपल्या समस्या, असुविधा सोशल मीडियावर मांडल्यावर लोकप्रतिनिधी धावत जाऊन समस्यांचे निवारण करत असतात. स्थानिक जनतेमध्ये विरोधक प्रबळ होऊ नये आणि आपली प्रतिमा मलीन होऊ नये यासाठी लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे जाऊन टाहो फोडत असतात. त्यामुळे कामांना गती येत असायची. प्रशासकीय राजवटीत हे शक्य होत नाही. कारण समस्या, असुविधांबाबत कितीही सोशल मीडियावर टाहो फोडला तरी प्रशासनाला काहीही फरक पडत नाही. त्यामुळे आपल्या प्रभागात स्थानिक लोकप्रतिनिधी कधी अस्तित्वात येतोय, याची आता सर्वसामान्य जनताही वाट पाहू लागले आहेत. प्रशासकीय राजवट आणि लोकशाही पद्धतीने निवडणुका आलेल्या लोकप्रतिनिधींचे सरकार यामध्ये जमीन आसमानचा फरक आहे. लोकप्रतिनिधींचा तळागाळातील जनतेशी थेट संपर्क असल्यामुळे आणि त्यांना आपल्या विभागातील नागरी कामांचा, सुविधांचा, समस्यांचा दांडगा अभ्यास असल्यामुळे लोकांना काय हवे आहे, कशाची गरज आहे याची माहिती असते. त्यामुळे अर्थसंकल्पात काय समाविष्ट असावे याबाबत ते ठामपणे भूमिका मांडू शकतात. जनसामान्यांना हव्या असलेल्या गोष्टींचा अर्थसंकल्पामध्ये समावेश करू शकतात. कारण त्यांना जनतेशी थेट 'फिल्ड'वर संबंध असतो. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मात्र तसे नसते. त्यांचा कारभार अवघ्या आठ तासांचा असतो. त्यांना लोकप्रतिनिधींसारखी लोकांची मर्जी सांभाळायची नसते. कामाच्या ठिकाणी वातानुकूलित कार्यालयात बसून ते नियोजनाचा आराखडा बनवत अर्थसंकल्प बनवत असतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या काळातील कारभार हा काही अंशी सुखावह असतो. जनसामान्यांशी निगडित असतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी लवकर निकाल देऊन निवडणूक आयोगानेही लवकरात लवकर निवडणुका घेणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधींच्या काळात खऱ्या अर्थाने विकासकामाला गती मिळत असल्याने आता प्रशासकीय राजवटीला कोठेतरी पूर्णविराम मिळणे काळाची गरज आहे.

# महिला दिनी महिलांनी दिली गरजवंत विद्यार्थ्याला सायकल

## माहेश्वरी महिला मंडळ, तालुका माहेश्वरी महिला संघटना, बहू-बेटी मंडळाचा आदर्शवत उपक्रम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०धा.रेल्वे**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने माहेश्वरी महिला मंडळ, धामणगाव तालुका माहेश्वरी महिला संघटना आणि बहू-बेटी मंडळ यांच्या वतीने एक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या विशेष दिवशी समाजातील महिलांनी गरजू विद्यार्थ्याच्या शिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने प्रवीण पेढीवाल या विद्यार्थ्याला सायकल आणि शालेय साहित्य प्रदान केले.या आदर्शवत उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सारिका राठी, धामणगाव तालुका माहेश्वरी महिला संघटनेच्या अध्यक्षा उषा राठी आणि सल्लागार जयश्री राठी यांच्या हस्ते तसेच धामणगाव तालुका माहेश्वरी संघटनेचे अध्यक्ष मुकेश राठी आणि माहेश्वरी हितकारक संघाचे माजी अध्यक्ष मनीष मूंधडा यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आली.कार्यक्रमाचे आयोजन गोपाल पेढीवाल यांच्या निवासस्थानी करण्यात आले.

यावेळी माहेश्वरी महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सीमा मूंधडा, सचिव सुनीता मूंधडा, कोषाध्यक्ष चंचल मूंधडा, सहसचिव वंदना टावरी, तालुका संघटनेच्या सदस्या पूनम लाहोटी, राजश्री मूंधडा, कविता पेढीवाल आदी उपस्थित होते.सल्लागार जयश्री राठी यांनी सांगितले, महिला दिन हा केवळ महिलांच्या हक्कांबाबत बोलण्याचा दिवस नसून तो समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाचा संदेश देतो. शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे आणि आम्ही या कार्यासाठी हातभार लावतो, याचा आम्हाला अभिमान आहे.या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्याला सायकल प्रदान करण्यात आली, जेणेकरून त्याच्या शाळेत जाण्याच्या अडचणी दूर होतील. तसेच त्याला स्कूल बॅग, पुस्तके, स्टेशनरी आणि इतर शालेय साहित्यही देण्यात आले. या मदतीमुळे विद्यार्थी आणि त्याच्या कुटुंबाने आनंद व्यक्त केला आणि समाजाच्या या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

माहेश्वरी महिला मंडळाच्या इतर सदस्यांनीही या प्रसंगी महिलांची भूमिका आणि समाजातील त्यांच्या योगदानावर विचार मांडले. भविष्यातही असे सामाजिक कार्य सुरू ठेवण्याचा संकल्प करण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिलांनी एकत्र येऊन शिक्षण आणि सामाजिक सेवेला चालना देण्याचा संदेश दिला. या प्रेरणादायी उपक्रमामुळे समाजात सहकार्य आणि सेवा वृत्ती अधिक दृढ झाली आहे.

# तुमची ई-पीक पाहणी झाली आहे का नाही? हे बघा आता घरबसल्या तुमच्या मोबाईलवर

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक** - महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना विविध योजना तसेच पिकांच्या नुकसानीची भरपाई लवकरात लवकर पोहचविण्याचा दृष्टीने सुरु करण्यात आलेली हि एक अत्यंत महत्वाची अशी योजना आहे.




महाराष्ट्र शासनाच्या ई-पीक पाहणी कार्यक्रमांतर्गत, रब्बी हंगाम २०२४-२५ साठी शेतकरी स्तरावरील नोंदणीची अंतिम तारीख १५ जानेवारी २०२५ होती. यानंतर, सहाय्यक स्तरावरील नोंदणी १६ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ दरम्यान करण्यात आली.

रब्बी हंगाम २०२४-२५ साठी शेतकरी स्तरावरील स्वत: आपण केलेली ई-पीक पाहणी किंवा सहाय्यक स्तरावरील झालेली ई-पीक पाहणी झाली का नाही हे बघण्यासाठी तलाठ्याकडे जायची आवश्यकता नाही ते तुम्ही तुमच्या मोबाईलवर पाहू शकता कसे ते आपण पुढे पाहूया.

ई-पीक पाहणी झाली का नाही हे पाहण्यासाठी काय कराल?

१) खाली दिलेल्या लिंकवरून ई-पीक पाहणी प डाउनलोड करा https://play.google.com/store/apps/details?id=io.sc.eppCordovahl=enšIN

२) डाउनलोड झाल्यानंतर प ओपन करा सगळ्या परमिशन -llow करा.





३) पुढे तुम्हाला महसूल विभाग निवडा असे दिसेल त्यात तुम्ही तुमचा महसूल विभाग निवडा.

४) त्यानंतर खालील बाणावर क्लिक करा.

५) पुढे लॉगीन पद्धत निवडा. ह्यात शेतकरी म्हणून वर क्लिक करा.

६) पुढे तुमचा मोबाईल नंबर टाका.

७) पुढे तुम्ही तुमचे खाते जोडले असेल तर खाते नंबर निवडा. (खाते नंबर जोडला नसेल तर सर्व माहिती भरून तो




जोडा)




८) खाते नंबर निवडल्यानंतर ४ अंकी संकेतांक नंबर टाका. (संकेतांक विसरला असेल तर खाली संकेतांक विसरलात? ह्यावर क्लिक करा तुमचा चार अंकी संकेतांक नंबर दिसेल तो तुम्ही वर टाका.)

९) संकेतांक नंबर टाकून खालील बाणावर क्लिक करून पुढे गेल्यावर एकूण ६ पर्याय दिसतील.

१०) या पर्यायांमध्ये शेवटचा पर्याय गावाचे खातेदारांची पिक पाहणी हा पर्याय निवडा.

११) पुढे तुम्हाला तुमच्या गावातील सर्व खातेदारांची नावे दिसतील यात तुमचे नाव शोधून त्यापुढे डोळ्यासारख्या चिन्हावर क्लिक करा तुमची पिक पाहणी झाली का नाही ते कळेल.




# 'या' लोकांनी चुकूनही खाऊ नये पपई, उच्च रक्तदाबासह भरभर वाढेल साखरेची पातळी...

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

उन्हाळा सुरु झाला की, बाजारात आपल्याला अनेक फळांची चव चाखायला मिळते.( त्यात अनेकांना आवडणारी पपई ही आरोग्यासाठी जितकी फायदेशीर आहे तितकीच हानिकारक. भारतात ९० टक्के लोक मधुमेहाच्या आजाराने ग्रस्त आहेत. रक्तातील साखर वाढल्याने अनेकांना मधुमेहासारख्या गंभीर आजाराला सामोरे जावे लागते.

पपईमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स ६० च्या आसपास असतो. याचे मर्यादित प्रमाणात सेवन केल्याने शरीरातील साखर झपाट्याने वाढत नाही. परंतु, याचे प्रमाण वाढले तर रक्तातील साखर वाढू शकते. मधुमेहाचे रुग्ण कच्ची किंवा अर्धी पिकलेली पपई खाऊ शकतात. कच्च्या पपईमध्ये साखर कमी असते. यात फायबरचे प्रमाण जास्त असते आणि चरबी कमी असते. कच्च्या पपईमध्ये लेटेक्स असते. तसेच पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि सोडियमचे स्त्रोत देखील असते. कच्ची आणि पिकलेली पपई रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. पपईमध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात जे शरीरातील इन्सुलिन पेशींना वेगाने वाढवतात. तसेच साखर चयापचय गतिमान करतात. मधुमेहाच्या रुग्णांनी कच्ची पपई खाल्ल्याने बद्धकोष्ठतेची समस्या आणि पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते.

**पपई किती प्रमाणात खावी?**

मधुमेहाच्या रुग्णांनी एक कपपेक्षा जास्त प्रमाणात पपई खाऊ नये. जास्त प्रमाणात पपई खाल्ल्याने शरीरातील साखरेची पातळी वेगाने वाढू शकते. पपईचा आहारात अनेक प्रकारे आपण समावेश करु शकतो.



या लोकांनी खाऊ नका पपई

ज्या लोकांना लेटेक्सची लर्जी असेल त्यांनी पपई खाल्ल्याने त्वचेवर लाल पुरळ, खाज येणे किंवा लर्जी असेल त्यांनी चुकूनही पपई खाऊ नका.

पपईमध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण अधिक असते. ज्यामुळे किडनी स्टोन असणाऱ्याच्या समस्यांमध्ये वाढ होऊ शकते.

गरोदर असणाऱ्या महिलांनी या काळात पपईचे सेवन करणे धोक्याचे ठरु शकते. पपईत असणारे घटक बाळाच्या विकासासाठी धोकादायक ठरु शकतात.

अतिप्रमाणात पपईचे सेवन केल्यास पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे खाताना विशेष काळजी घ्यावी.

# वनकर्मचाऱ्यांच्या अंगावर ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती** साठवून ठेवलेली वाळू ट्रॅक्टरव्दारे भरून तस्करी केली जात असल्याची माहिती मिळताच वन कर्मचारी तेथे पोहोचले. यावेळी कारवाई करीत असताना त्यांना धक्काबुक्की करून त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. कवठाळ गावात ही घटना रात्री १० वाजता घडली.नजिकच्या कवठाळ येथे साठवून ठेवलेली वाळू ट्रॅक्टरमध्ये भरून तस्करी केली जात असल्याची माहिती मिळताच सहायक वनपरिक्षेत्र अधिकारीप्रदीप बावणे हे त्यांच्या अधिनस्त बिट कर्मचाऱ्यांसोबत घटनास्थळी पोहोचले. यावेळी कारवाई करीत असताना ट्रॅक्टर मालक अभिजीत राजकुमार वानखडे हा तेथे पोहोचला. तुम्ही माझे काही करू शकत नाही असे म्हणून जीवे मारण्याची धमकी देत वन कर्मचाऱ्यांसोबत धक्काबुक्की करून त्यांच्या अंगावर वाळूचा ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी शिरखेड पोलीस ठाण्यात तक्रारीनुसार अभिजीत वानखडे याच्याविरूध्द कलम १३२, ३५२,३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# जगातील एकमेव हिंदू सनातन धर्म महिलांना सन्मान देणारा-सौ. दुर्गाताई बिसंदरे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०धारणी-** धारणी येथे स्कील इंडियाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून सौ.दुर्गाताई बिसंदरे,सोबतच क्षमा चौकसे, मोनिका पांडे स्कील इंडियाच्या महिला पदाधिकारी अश्विनी पटेल, आनंदी भिलावेकर, जसोदा दहीकर, ख़ुशी पाल, काजल पकडे आदी मंचावर उपस्थित होत्या. यावेळी स्कील इंडिया कडून महिला सक्षमीकरणासाठी उद्योजक कार्याची प्रदर्शनीही ठेवण्यात आली होती.

कार्यक्रमात संबोधित करताना सौ. दुर्गाताई बिसंदरे यांनी सांगितले की, जगातील एकमेव हिंदू सनातन धर्म आहे, जो महिलांना समानतेचा दर्जा व अधिकार देतो. याचे अनेक उदाहरणे देता येतील. माता दुर्गा पूजन, सिताराम, राधाकृष्णा अशी अनेक दाखले आहेत. हजारो वर्षांपूर्वीपासून हिंदू सनातन धर्मात महिलांना किती आदराने सन्मान दिला जात असे, यावरून हे स्पष्ट होते. आपल्या भारतात महिलांना सम्मान देण्याची परंपरा होती. परंतु, परकीयांनी आपल्या देशावर आक्रमणे, धर्मप्रचार व संपत्ती लुटण्यासाठी केली. शेकडो वर्षे परक्यांनी आपल्या देशावर राज्य केल्याने आपली संस्कृती नष्ट



करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे आपल्या लोकांमध्ये आपल्याच हिंदू धर्माविषयी जी नाकारात्मकता निर्माण झाली, ती संपवण्याची गरज आहे.

त्यांनी यावेळी महिलांना सल्लाही दिला, महिलांनी आपल्या कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासोबतच आपल्या मुलांना उत्तम संस्कार देण्याचे काम अग्रस्थानी ठेवावे. सध्या आमच्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कौशल विकासाला अग्रस्थानी ठेवून महिलांना आर्थिक बळकटीकरण व कौशल्य विकासासाठी अनेक योजना राबवल्या आहेत. महिला कौशल्यपूर्ण झाल्यास कुटुंब सक्षम होण्यास वेळ लागणार नाही, ही त्यांची संकल्पना आहे. धारणी तेथील तलाई कॅम्पमध्येही जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सौ. दुर्गाताई बिसंदरे यांनी घरकाम करून आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण करणाऱ्या व आर्थिक बचत करणाऱ्या महिला रुखमणी बेलसरे व अनिता धुर्वे, दुर्गा धनसिंगपाल यांचा शाल, श्रीफळ व साडी देऊन सत्कार केला.

## देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे महिलांना कौशल्य पूर्ण करण्याचे ध्येय

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक


सोमवार दि. १० मार्च २०२५ — शहर/ग्रामिण


## सम्राट मेन्सवेअरचे संचालक पुरूषोत्तम हरवानी यांच्यावर हल्ला

### झेनिथमध्ये उपचार सुरू, व्यापारी क्षेत्रात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** येथील सम्राट मेन्सवेअरचे संचालक पुरूषोत्तम हरवानी (वय ६२, रा. दरोगा प्लॉट) यांच्यावर रात्री ८.५० वाजताच्या सुमारास चौधरी चौकातील हॉटेल आदर्शमध्ये काचेच्या ग्लासाने हल्ला चढवून त्यांना गंभीर जखमी करण्यात आले.



सूत्रानुसार, पुरूषोत्तम हरवानी यांच्या मालकीचे चौधरी चौकातील हॉटेल त्यांनी दीडवर्षांपूर्वी राजेश अमरलाल तरडेजा (वय ५१, रा. कंवरनगर) याला सुमारे १२ खोक्यांमध्ये विकले होते. त्या व्यवहारातील काही रक्कम राजेश तरडेजा याच्याकडून घेणे होते. तो हिशेब गेल्या कित्येक दिवसांपासून रखडलेला होता. पुरूषोत्तम हरवानी यांनीवेळोवेळी त्या रकमेची मागणी तरडेजा याच्याकडे केली होती. दरम्यान राजेश तरडेजा याने ते हॉटेल दीपक रामरख्यानी याला विकण्याचा सौदा केला. दरम्यान रविवारी (ता. नऊ) राजेश तरडेजा याने ४० ते ५० कॉल पुरूषोत्तम हरवानी यांना करून हिशेब पूर्ण करण्यासाठी हॉटेलमध्ये बोलाविले. त्यानुसार रात्री ८.३० वाजताच्या सुमारास पुरूषोत्तम हरवानी आणि त्यांचा मुलगा आदर्श, हे पितापूत्र हिशेब करण्यासाठी हॉटेल आदर्शमध्ये पोहोचले. तेव्हा राजेश तरडेजा हा हॉटेलच्या रुम क्रमांक ५०४ मध्ये मद्यपान करीत होता. तेथे वीरवान नावाचा दलाल आणि एक महिलासुद्धा उपस्थित होती. हरवानी पितापूत्र हॉटेलमध्ये पोहोचताच



मद्यधुंद राजेश तरडेजा याने त्यांना शिविगाळ सुरू केली. त्यावर मुलगा आदर्श (वय २६) याने आक्षेप घेतला. एकीकडे हिशेब करण्यासाठी बोलावायचे आणि शिवीगाळ करायची हा काय प्रकार आहे, असे म्हटले. त्यादरम्यान हा वाद वाढला. राजेश तरडेजा याने काचेचा ग्लास फोडून तो अनुकुचीदार ग्लास पुरूषोत्तम हरवानी यांच्या चेहऱ्यावर भोसकला. यात पुरूषोत्तम हरवानी हो गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ झाले. त्यांना वॉलकट कम्पाऊंड येथील झेनिथ हॉस्पिटलमध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. या घटनेची माहिती शहर कोतवाली पोलिसांना देण्यात आली असून पोलीस पुढील तपास करीत आहे.

## अर्थसंकल्पात ८ वेळा घोषणा होऊन संत्रा प्रकल्प अस्तित्वात नाही !

### विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अत्याधुनिक संत्रा प्रकल्पाची अपेक्षा !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मोर्शी –** विदर्भात एवढ्या वर्षाच्या काळात आज पर्यंत एकही संत्रा प्रक्रिया प्रकल्प राज्य सरकारला उभारता आला नाही ही शोकांतिका आहे, विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फक्त तारीख पे तारीख देऊन सन १९५७, १९६३, १९९२, १९९५, २०१४, २०१७, २०१९, २०२१ च्या अर्थसंकल्पात संत्रा प्रक्रिया प्रकल्पाची घोषणा करून विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक केल्या गेली आहे. संत्रा प्रकल्पासाठी केल्या गेलेल्या या तारखा आणि घोषणा कधीच फळाला आल्या नाहीत. काही प्रकल्प सुरू होण्याच्या आधीच सुपडासाफ झाले. तर काही हवेतल्या हवेतच गायब झाले असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा शासनाच्या पोकळ घोषणांवर आता विश्वास राहिला नसल्याचे मत संत्रा उत्पादक शेतकरी व्यक्त करीत आहे.

अमरावती जिल्ह्यातील मोर्शी वरूड तालुका हा संत्रा विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून विदर्भाचा कॅलिफोर्निया म्हणून ओळखल्या जात असून आशीया खंडातील सर्वात जास्त पिकविला जाणाऱ्या मोर्शी वरूड तालुक्यातील नागपुरी संत्राने वेगळी ओळख निर्माण केली आहे. मोर्शी वरूड तालुक्यात ४७ हजार हेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात आंबिया व मृग बहाराच्या संत्र्याचे विक्रमी उत्पादन घेतले जाते. परंतु मोर्शी वरूड तालुक्यात कुठेच संत्रावर प्रक्रिया करणारा प्रकल्प नाही, कोल्डस्टोरेज व वेअर हाऊस सुविधा नाही, तसेच संत्रा व मोसंबीवर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पाची वाणवा असल्याने शसानाच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांना त्यांचा संत्रा कवडीमोल भावात विकावा लागत असल्याचा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे.



मागील काही वर्षांपूर्वी वरूड तालुक्यात संत्रा परिषदेच्या उद्घाटनाला आलेले राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरूड येथे ऑरेंज डीहायड्रेशन प्रकल्प उभारणीची घोषणा केली होती. नंतर महाआघाडी सरकारनेदेखील वरूड- मोर्शीसाठी संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारण्याची घोषणा केली मात्र ती पूर्ण होऊ शकली नाही. महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये सन २०२१ मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी मोर्शी वरूड तालुक्यात अत्याधुनिक संत्रा प्रक्रिया प्रकल्प साकारणार असल्याची दमदार घोषणा केली. मात्र त्यावर ३ वर्षाचा कालावधी लोटून गेला आणि आता पुन्हा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी २०२४ चा अर्थसंकल्प सादर केला त्यामध्येही ८ व्या वेळा घोषित झालेल्या अत्याधुनिक संत्रा प्रकल्पासाठी आर्थिक तरतुद होऊ शकली नसल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा भ्रमनिराश झाल्याचे पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर शासनाने घोषित केलेल्या ऑरेंज डीहायड्रेशन प्रकल्प, अत्याधुनिक संत्रा प्रकल्प, हीवरखेड (ठाणा ठूनी) येथील जैन फार्म फ्रेश संत्रा उन्नती प्रकल्पा करीता निधी उपलब्ध करून संत्रा प्रक्रिया पूर्णत्वास न्यावे तसेच २०२५ च्या अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करून अत्याधुनिक संत्रा प्रकल्पाची घोषणा करावी अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.


शासनाच्या उदासीन धोरणामुळे विदर्भ संत्राफळांच्या उत्पादनात माघारत आहे. उत्पादन चांगले असले तरी भाव मिळत नाही. शेती उद्योग प्रयोगशील असला पाहिजे. संत्री टेबल फ्रूट असून, चव चांगली आहे. यामुळेच ती जगात पोहचविणे गरजेचे आहे. सिंगापूर, बांग्लादेश,दुबईसारख्या देशांत संत्री कंटेनरने पोहचविण्याचा प्रयत्न सरकार तर्फे करणे गरजेचे आहे. कोकाकोला आणि जैन इरिगेशनचा संयुक्त प्रकल्प मोर्शी तालुक्यातील हिवरखेड (ठाणाठुणी) येथे साकारण्यात आला. परंतु ८ वर्षाच्या काळामध्ये जैन फार्म फ्रेश संत्रा उन्नती प्रकल्ल शासनाच्या उदासीन धोरणामुळे पूर्णत्वास जाऊन न शकल्यामुळे मोर्शी वरूड तालुक्यातील हजारो संत्रा उत्पादकांचा हिरमोड झाला आहे.

## महिनाभरात जलसाठ्यात १२ टक्क्यांची घट

### अमरावतीकरांनो पाणी जपून वापरा !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती :-** उन्हाची तीव्रता वाढू लागली असून ग्रामीण व डोंगराळ भागात पाणी टंचाईचे चटके जाणवू लागले आहेत. जिल्ह्यातील मोठ्या, मध्यम व लघू, अशा एकूण ५६ सिंचन प्रकल्पांत सद्यस्थितीत ५४ टक्के (५६८ दलघमी) जलसाठा शिल्लक आहे. यामुळे या प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या शहरी व ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना पुरेसा जलसाठा मिळणार आहे. या भागांना टंचाईच्या झळा बसणार नसल्या तरी दोन मध्यम व लघू प्रकल्पांच्या क्षेत्रातील योजनांना मात्र टंचाईच्या झळा पोहोचण्याची शक्यता आहे. गेल्या महिनाभरात पाणी साठ्यात १२ टक्क्यांची घट झाली आहे.जिल्ह्यात अप्पर वर्धा या मोठ्या प्रकल्पासह सात मध्यम व ४८ लघू प्रकल्प आहेत. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ६६ टक्के पाणीसाठा शिल्लक होता, तो आता ५४ टक्क्यांवर आला आहे. अप्पर वर्धा धरणात विद्यमान स्थितीत ३२० दलघमी (५६ टक्के) जलसाठा उपलब्ध आहे. या प्रकल्पातून अमरावती शहरासह ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना पुरवठा करण्यात येतो. हा जलसाठा उन्हाळ्यात कमी पडणार नसल्याचे जलसंपदा




**पाणीसाठ्याची सद्यस्थिती (दलघमी/टक्के)**

| | |
|---|---|
| अप्पर वर्धा | - ३२० / ५६ |
| शहानूर | - २९ / ६४ |
| चंद्रभागा | - ३१ / ७७ |
| पूर्णा | - २५ / ७१ |
| सपन | - ३३ / ८७ |
| पंढरी | - १४ / २५ |
| बोर्डीनाला | - २.४३ / २० |
| ४८ लघू प्रकल्प | - ११० / ४८ |

विभागाच्या अधिकाऱ्यांचे मत आहे. यंदा पावसाळ्यात मुबलक पाऊस झाल्याने धरणे शंभर टक्के भरली होती.सात मध्यम प्रकल्पांतील जलसाठ्याची स्थिती सध्या चांगली आहे. एकूण १३७ दलघमी (५३ टक्के) जलसाठा या प्रकल्पांमध्ये सद्यस्थितीत असून पंढरी व बोर्डीनाला या प्रकल्पातील साठा मे महिन्याच्या मध्यात संपुष्टात येण्याची शक्यता आहे. तर शहानूर, चंद्रभागा, सपन व पूर्णा या प्रकल्पातील जलसाठा सध्या सरासरीने उत्तम असला तरी पुढील हंगामात पावसाला विलंब झाल्यास टंचाईची स्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

लघू प्रकल्पांच्या क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना अडचणीत येण्याची शक्यता असून पाणीटंचाई निर्माण होण्याचा अंदाज आहे. ४८ लघू प्रकल्पांत ४८ टक्के जलसाठा शिल्लक आहे. यातील काही प्रकल्पांनी तळ गाठण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यामुळे लघू प्रकल्पांच्या क्षेत्रातील नागरिकांना टंचाईच्या झळा बसण्याची शक्यता अधिक आहे.

## १९३५ गावांची पशूगणना पूर्ण तर ७८ गावे अपूर्ण

### २७० गावांमध्ये प्रगणनेचे काम सुरूच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती –** जिल्ह्यात २५ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या २१ व्या पशुगणनेत




आतापर्यंत २२८३ गावापैकी १९३६ गावांची पशुगणना पूर्ण झाली असून ७८ गावे अपूर्ण आहे. २७० गावांमध्ये प्रगणनेचे काम सुरू आहे. जिल्ह्यात डिजिटल स्वरूपातील ही पशुगणना २८ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करायची होती, मात्र पूर्ण न झाल्याने मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. कावरे यांनी दिली.डॉ. कावरे यांनी सांगितले की, जिल्ह्यात पाच लाख २५ हजार १५१ एवढ्या प्राण्यांची गणना झालेली आहे. पोल्ट्री फॉर्ममध्ये १३ लाख ७४ हजार २१५ संख्या असून त्यापैकी दहा लाख ४७ हजार ५०३ ची गणना झालेली आहे. पशुगणनेला मुदतवाढ मिळाल्यामुळे आता ७६ गावांमध्येच पशुगणना बाकी असून २७० गावांमध्ये सध्या सुरू आहे. काम झपाट्याने करून पशुगणना पूर्ण करण्यात येईल. जिल्ह्यातील एकूण २०१८ गावे आणि २४७ नागरी वाड्यांमधील एकूण २२८३ गावापैकी १९३६ गावांमध्ये पशुगणनेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सध्या २७० गावांमध्ये जनगणनेचे काम सुरू आहे. पशुगणनेसाठी ग्रामीण भागात १८० प्रगणक व ४८ निरीक्षक व शहरी भागात ५५ प्रगणक व १६ निरीक्षक असे एकूण २९९ प्रगणक-पर्यवेक्षक प्रत्येक जनावराची आकडेवारी संकलित करत आहेत.

मोजणीसाठी खास ॲप विकसितकरण्यात आले आहे. याद्वारे गणना अधिकारी घरोघरी जाऊन गाय, म्हैस, बैल, मेंढी, शेळी, डुक्कर अशा १६ प्रजातींच्या प्राण्यांची माहिती गोळा करीत आहेत. हे ॲप जीपीएस प्रणालीशी जोडलेले आहे. याच्या मदतीने नेटवर्क नसले तरी नेटवर्क झोनमध्ये गेल्यावर डेटा सेंट्रल सव्र्हरशी जोडला जाऊ शकतो. या ॲपद्वारे प्राण्यांची माहिती आणि त्यांच्या मालकाची ओळखही कळते.

**२५ प्रश्नांची यादी, प्राध्यापकांद्वारे प्राण्यांची माहिती**

२५ प्रश्नांची यादी आहे. ज्यामध्ये पशुपालकांच्या प्राथमिक माहितीशिवाय त्यांच्या शेतीची मालमत्ता, उत्पन्नाचे स्रोत, जातीनिहाय माहिती आणि त्यांचे पशुधन यांची माहिती संकलित केली जात आहे. यामध्ये कोणत्या गावात किती जनावरे आहेत, किती गावे जनावरे नसलेली आहेत, कोणत्या गावात प्राण्यांच्या सर्वात जास्त प्रजाती आहेत. याचा अद्ययावत तपशील उपलब्ध होणार आहे.


**भटक्या विमुक्तांच्या पशुधनाची प्रथमच स्वतंत्र मोजणी**

इतर जिल्ह्यांतून व राज्यांतून जिल्ह्यात येणाऱ्या भटक्या जातीतील उंट, घोडे, टट्टू, खेचर, गाढवे, हत्ती अशा पशुधनाची प्रथमच स्वतंत्र मोजणी केली जात आहे. त्यामुळे जिल्हा पशुधन विभागाला भटक्यांची स्वतंत्र आकडेवारीही मिळणार आहे. त्यामुळे भटक्या प्राण्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

## रामदेवबाबांचं परखड भाष्य, औरंगजेब आणि त्याचं कुटुंब लुटारु होतं, बाबर, अकबर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०नागपूर–** औरंगजेब हा लुटारु होता त्याचं कुटुंब लुटारु होतं. भारत लुटायला तो आणि त्याचं खानदान चालून आलं होतं त्याचा आदर्श आपल्यापुढे कसा काय असेल? आमचे आदर्श छत्रपती शिवाजी महाराज आहेत असं योगगुरु बाबा रामदेव यांनी म्हटलं आहे. नागपुरात पतंजलीच्या फूड पार्कच्या उद्घाटन प्रसंगी रामदेव बाबा बोलत होते.छावा चित्रपट आल्यापासून महाराष्ट्रात औरंगजेबाची चर्चा रंगली आहे. त्याचप्रमाणे अबू आझमी यांनी औरंगजेब क्रूर नव्हता तो उत्तम प्रशासक होता असं वक्तव्य केलं. त्यामुळे त्यांचं अधिवेशन संपेपर्यंत निलंबन करण्यात आलं आहे. दरम्यान नागपूरच्या कार्यक्रमात रामदेवबाबांनी औरंगजेब आमचा आदर्श असूच शकत नाही असं म्हटलं आहे.औरंगजेब भारताचा आदर्श असूच शकत नाही, तो क्रूर होता. औरंगजेब लुटारु होता त्याचं कुटुंब लुटारु होतं. बाबर काही भारतात काही घडवायला आला नव्हता. बाबर, अकबर, औरंगजेब त्यांची मुलं या सगळ्यांनी हरम तयार केले. आपल्या हजारो आया-बहिणींची त्यांनी बेअब्रू केली. आपल्या देशाची ओळख पुसण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अशी माणसं आपला आदर्श असूच शकत नाहीत. आपला सगळ्यांचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराज आहेत, औरंगजेब आमचा आदर्श असूच शकत नाही. असा योगगुरु बाबा रामदेव यांनी म्हटलं आहे.



## आष्टगाव अंबाडा मार्गावर भीषण अपघात १ ठार २ जखमी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१०मोर्शी–** तालुक्यातील अंबाडा येथून मोर्शीला परत येत असताना झालेल्या अपघातात एक युवक घटनास्थळी ठार झाला असून इतर तीन जण गंभीररित्या जखमी झाल्याची घटना शनिवार दि ८ मार्च रोजी संध्याकाळी ८वाजताच्या सुमारास घडली.मोर्शी येथील दुर्गा नगर भागातील रहिवासी भारत फायनान्स मध्ये कार्यरत असणारे शाखा व्यवस्थापक गजेंद्र अनिल चरपे वय ३२ वर्ष रा कुऱ्हा ता चांदूरबाजार तसेच त्यांचे सहकारी रुपेश यशवंतराव इंगोले वय ३४ वर्ष रा जळका हिरापूर ता. भातकुली, यश प्रकाश बोरवार वय २१वर्ष रा कुऱ्हा ता. चांदूरबाजार व देवेंद्र थोरात रा गोराळा ता. मोर्शी हे आपल्या कंपनीच्या कामाकरिता गजेंद्र चरपे यांच्या चारचाकी गाडी क्रमांक एमएच २७ डी एल ३१६४ या वाहनाने अंबाड्याला गेले होते. तेथून मोर्शीला परत येत असताना अंबाडा-आष्टगावच्या मधील वळण रस्त्यावर भरघाव गाडीवरचे नियंत्रण सुटल्याने गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरदार आदळली.या अपघातात रुपेश इंगोले नमक तरुणाचा घटना स्थळी ठार झाला तर इतर जखमींना अंबाडा येथील युवकांनी तात्काळ मोर्शी येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचारा साठी दाखल केले होते.त्यापैकी यश बोरवार हा गंभीर जखमी झाल्याने त्याला पुढील उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले




## शालेय मध्यान्न भोजन शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांना मासिक ७२०० मानधन द्यावे

### माजी जिल्हा परिषद सदस्य सुखदेवराव पवार यांची मागणी चालू अधिवेशनात प्रस्ताव घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१०अचलपूर: –** गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शालेय मध्यान भोजन योजना उपयोगी ठरत असून हे भोजन शिजवणाऱ्या कर्मचाऱ्यांना मासिक ७२०० रुपये मानधन देण्याची मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य प्राचार्य सुखदेवराव पवार यांनी शिक्षण मंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे संपूर्ण महाराष्ट्रात सरकारी शाळांमध्ये मध्यान्न भोजन ही योजना सर्वसामान्य जनतेच्या पाल्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे आणि या योजनेची फलश्रुती चांगली असून ही योजना यशस्वी झालेली आहे. ही योजना यशस्वी करण्यासाठी लाभ घेणारे विद्यार्थी शाळेचे मुख्याध्यापक सहाय्यक शिक्षक आणि चविष्ट मेनू तयार करणाऱ्या स्वयंपाकी आणि मदतनीस यांच्या भरोशावर ही योजना चालत आहे स्वयंपाकी आणि मदतनीस यांनी देत असलेल्या सेवा प्रति मिळणारे मानधन मासिक २५०० इतके आहे या मानधनात त्यांना पूर्ण दिवस शाळेत कामे करावी लागतात यामुळे इतरत्र रोजगार किंवा आर्थिक मिळकत यापासून ते वंचित राहतात दिवसेंदिवस सतत महागाई वाढत आहे त्याचा परिणाम त्यांच्या परिवाराच्या जीवनमानावर होतो आहे यातूनच निर्माण होणाऱ्या दैनंदिन अडचणी पाहून परिवार चालवणे दिवसेंदिवस या महागाईच्या काळात कठीण झालेले आहे. यांचा जीवनमानाचा स्तर वाढविण्याकरिता त्यांचे मासिक मानधन वाढविणे गरजेचे आहे. रोजगार हमी योजनेतून प्रति मजुराला २४० रुपये मिळतात महिनाभर काम मिळाल्यास ७२०० मासिक मजुरी मिळते याचप्रमाणे या मध्यान्न भोजन शिजविणाऱ्या स्वयंपाकी आणि मदतनीस यांना मानधन वाढवून द्यावे .



# भारताच्या विजय मिरवणुकीत दगडफेक

## मध्यप्रदेश मधील महू येथे दोन गटांमध्ये संघर्ष

### दुकाने आणि वाहने जाळण्यात आली; पोलिसांनी केला लाठीचार्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०महू मध्यप्रदेश–** मध्यप्रदेशातील महू येथे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये टीम इंडियाच्या विजयानंतर काढलेल्या मिरवणुकीदरम्यान वाद झाला. दोन्ही गट आमनेसामने आले. लोकांनी दुकाने आणि वाहने पेटवली.

पेट्रोल बॉम्बही फेकण्यात आले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला आणि अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या. लष्कराच्या जवानांनीही जबाबदारी स्वीकारली. सुमारे अडीच तासांनंतर परिस्थिती नियंत्रणात आणता आली.

रविवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. भारताच्या विजयानंतर, १०० हून अधिक लोक ४० हून अधिक बाईकवरून मिरवणूक काढत होते. यामध्ये सहभागी असलेले लोक जय श्रीरामच्या घोषणा देत होते.

दरम्यान, जामा मशिदीजवळ फटाक्यांवरून लोकांशी वाद झाला. दुसऱ्या बाजूच्या लोकांनी मागून येणाऱ्या पाच–सहा लोकांना थांबवले आणि मारामारी सुरू केली.



**दगडफेकीनंतर वाद वाढला**

जेव्हा पुढे चालणाऱ्या लोकांना हे कळले तेव्हा त्यांनी दगडफेक करायला सुरुवात केली. यानंतर दुसऱ्या बाजूने आलेल्या लोकांनीही दगडफेक सुरू केली. काही वेळातच वाद वाढला. काही दुचाकीस्वार पट्टी बाजारात गेले, काही कोतवाली आणि उर्वरित इतर भागात गेले.

येथे, संतप्त लोकांनी पट्टी बाजार परिसरात दगडफेक सुरू केली. येथे त्यांनी घरे आणि दुकानांबाहेर पार्क केलेल्या वाहनांची तोडफोड करण्यास सुरुवात केली. पाच ते सहा जण जखमी झाल्याचे वृत्त आहे.

**चार पोलिस ठाण्यांचे पोलिस बंदोबस्त तैनात**

गोंधळ वाढू लागल्याने, जवळच्या चार पोलिस ठाण्यांमधील पोलिस दलांना महू येथे पाचारण करण्यात आले. ३०० हून अधिक सैन्य तैनात करण्यात आले. जिल्हाधिकारी आशिष सिंह आणि डीआयजी निमिश अग्रवाल पहाटे १.३० वाजता महू येथे पोहोचले. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी त्यांनी शहरात फेरफटका मारला.

**१२ हून अधिक दुचाकी आणि दोन कार पेटवण्यात आल्या**

पट्टी बाजार, मार्केट चौक, जामा मशीद, बटख मोहल्ला आणि धान मंडी बाहेर पार्क केलेल्या १२ हून अधिक दुचाकींना हल्लेखोरांनी आग लावली. दोन गाड्यांची तोडफोड करण्यात आली आणि त्यांना आग लावण्यात आली. पट्टी बाजार परिसरात प्रेस क्लबचे अध्यक्ष राधे लाल यांच्या घराला आग लावण्यात आली. बटख मोहल्ला येथे एका दुकानाला आग लावण्यात आली. मार्केट चौकातील दोन दुकानांबाहेर आग लावण्यात आली.

# होळीला तयार चकली हार आणि होलीकास्टची मागणी

### गायीच्या शेणापासून बनविल्याने महिलांना मिळाला रोजगार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती** आणि होळीचा फोटोयावर्षी होळीचा सण १३ मार्चला साजरा केला जाणार आहे. त्यासाठी ग्रामीण भागात पारंपरिक चकोल्याचे (विविध आकारांच्या शेणाच्या गोठ्या) उत्पादन सुरू झाले आहे.ग्रामीण भागात बनवलेल्या या पारंपरिकआणि आकर्षक तयार चकोल्यांना शहरात मोठी मागणी आहे. शहरात ही माळा ३० रुपये आणि खुल्या चकली २० रुपये डझन दराने विकल्या जात आहेत. या व्यवसायाने सणासुदीच्या काळात नवीन रोजगारही उपलब्ध करून दिला आहे.होळीचा सण शहर तसेच ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. ग्रामीण भागात नागरिक होळीच्या वेळी जाळण्यासाठी गाईच्या शेणापासून बनवलेल्या खास चकोलीच्या माळा तयार करतात आणि त्यांच्या माळा बनवून होळी सजवतात. मग या होळीची पूजा केली जाते आणि विधीनुसार पेटवली जाते.सध्या शहरी भागात शेण उपलब्ध नाही. त्यामुळे आता शहरी रहिवाशांना तयार रेडिमेड चकलींचे हार आणि होलीकास्ट उपलब्ध झाले आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ (च–तखच्) अमरावती अंतर्गत पूनम महिला बचत गट धारणी यांनी आकर्षक चकोली डिझाइन देखील तयार केल्या आहेत.



## कॉंग्रेसच्या शहर अध्यक्षांच्या घरावर गोळीबारः परिसरात तणाव, घुग्घुस शहरातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०चंद्रपूर–** चंद्रपूरमध्ये कॉंग्रेस शराध्यक्ष राजू रेड्डी यांच्या घरावर काही अज्ञातांनी गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. काल रात्री ८ ते ९ वाजेच्या दरम्यान दोन जणांनी घरावर गोळ्या झाडल्याची माहिती आहे. मात्र, गोळीबार करण्याचे कारण समजू शकले नाही.दरम्यान घुग्घुस शहरात कॉंग्रेस शहराध्यक्ष राजु रेड्डी यांच्या घरावर हल्ला झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटळास्थळी जात पुढील कारवाई सुरू केली आहे. हल्ला झाला त्यावेळी रेड्डी घरी उपस्थित होते.



गोळीबारानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांना रेड्डी यांच्या घराच्या वरच्या मजल्यावरील गॅलरीत गोळीबारात वापरलेले काडतूस आढळून आले आहे.या भ्याड हल्लयाची माहिती घुग्घुस मध्ये पसरताच राजु रेड्डी यांच्या समर्थकांची मोठी गर्दी त्यांच्या घराबाहेर जमली, ज्यामुळे वातावरण आणखी तापले. पोलिसांनी रेड्डी यांच्या घरा सभोवती तगडा पोलीस बंदोबस्त त्याला तैनात केला आहे. हा हल्ला एका सुनियोजित कटाचा भाग असल्याचे रेड्डी यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. पोलिस या प्रकरणाचा वेगवेगळ्या दिशेने करीत आहेत.

**सीसीटीव्ही फुटेजचा तपास सुरू**

चंद्रपूर पोलिसांकडून आरोपींच्या शोधासाठी शहरातील सीसीटीव्ही रेकॉर्डिंग तपासले जात असून या घटनेमागे राजकीय की व्यावसायिक वाद आहे याविषयी तर्कवितर्क व्यक्त केले जात आहे. मात्र यातील आरोपीला शोधून काढणे हे पोलिसांपुढचे आव्हान असणार आहे. नागरिकांना अफवांवर लक्ष देवू नये, पोलिस विभागाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# देशभरातील सरकारीकरण झालेली मंदिरे सरकारमुक्त करा! – मंदिर महासंघ

### महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशनात अनेक मुद्यांवर विचारमंथन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** अमरावतीसह विदर्भातल्या अनेक सार्वजनिक मंदिर ट्रस्टच्या जमिनी काही महसूल अधिकारी,बिल्डर लॉबी यांच्याशी संगनमत करून हडपण्याचा प्रकार करण्यात आलेला आहे तर या विरोधात महाराष्ट्र शासनाने तत्काळ 'अँटी लँड ग्रॅबिग'कायदा करावा यांसह मंदिर सुरक्षा, मंदिर समन्वय, मंदिर धर्मप्रचाराचे केंद्र व्हावे तसेच युवा संघटन इत्यादी विषयांवरील मागण्यांसाठी अधिवेशन संपन्न झाले. ते जहागिरपूर येथे आयोजित महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशनाच्या (अमरावती विभाग) उद्घाटनप्रसंगी बोलत होते. ज्यांनी मंदिरांच्या जागा बळकावल्या त्या मुक्त करून ताबडतोब मंदिरांच्या ताब्यात देण्यात याव्यात. आपल्या मंदिरांमध्ये बऱ्याच ठिकाणी अहिंदू व्यवसाय करत असतात तेव्हा मंदिरातलं, तिथल्या जत्रेचं, तिथल्या उत्सवाच पावित्र्य राखणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे,अशावेळी कुठल्याही अहिंदूंच्या कृतीमुळे मंदिरातील पावित्र्य नष्ट होऊ असे वाटत असेल तर अयोग्य गोष्टींना प्रतिबंध करावा, असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशनाचे आयोजन महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने श्री महारुद्र हनुमान मंदिर, जहागिरपूर, जिल्हा अमरावती मंदिराच्या प्रांगणात रविवारी करण्यात आले होते. अधिवेशनाचे सह आयोजक म्हणून *श्री महारुद्र हनुमान मंदिर– जहागिरपूर,श्री पिंगळादेवी संस्थान– नेरपिंगळाई , श्री नागेश्वर महादेव संस्थान – धामंत्री, , देवस्थान सेवा समिती – विदर्भ व हिंदू जनजागृती समिती हे सहभागी झाले होते.* यावेळी व्यासपीठावर महारुद्र मारुती देवस्थान चे अध्यक्ष *श्री ओम प्रकाश परतानी, महंत श्री पंचदशनाम आखाडा कैलास आश्रम वरुड चे पू.वसुदेव नंद गिरी महाराज, श्री जनार्दन पंत बोथे– अ.भा.गुरुदेव सेवा मंडळ राष्ट्रीय सरचिटणीस , सनातन संस्थेचे धर्मप्रसारक संत पू. अशोक पात्रीकर, पू.जयगिरी महाराज, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री सुनील घनवट, श्री संदिप तुकाराम दौंडकर हे मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्* या हस्ते दीपप्रज्वलनाद्वारे अधिवेशनाचा प्रारंभ करण्यात



**अधिवेशनामध्ये या मुद्यावर विचारमंथन**

रण्यात आले तसेच सर्वानुमते पुढील ठराव पारित करण्यात आले. महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेत सर्वानुमते पारित करण्यात आलेले ठराव: १ . मंदिरांचे व्यवस्थापन सरकारने मुक्त करावे. २. मंदिरांची संपत्ती विकासासाठी वापरण्यास मनाई. ३. धर्मदाय आयुक्त कार्यालयाची नियमबाह्य पत्रे थांबवावीत. ४. पौराणिक मंदिरांचे जीर्णोद्धार करण्यासाठी निधी द्यावा. ५. इस्लामी अतिक्रमणे हटवावीत. ६. 'क' वर्गातील मंदिरे 'ब' वर्गात वर्गीकरण करावीत. ७. मंदिरे आणि तीर्थक्षेत्रांमध्ये मद्य व मांस विक्रीला विरोध. ८. पुजाऱ्यांना मानधन देण्याची व्यवस्था करावी.

आला. यावेळी बोलतांना *सुनील* *घनवट* पुढे म्हणाले, महाराष्ट्रामध्ये जी मंदिरे सरकारीकरण झालेली आहेत ती तात्काळ सरकार मुक्त करून भक्तांच्या ताब्यात देण्यात यावी तसेच वॅक्फ बोर्ड ,सरकार व भूमाफीया यांच्या ताब्यात एक इंच भूमी सुद्धा जावू देणार नाही. मंदिरांच्या जमिनी हडपणाऱ्या बिल्डर लॉबीच्या, भू–माफिया यांच्या विरोधात कारवाई न करता कोकणातल्या सहस्त्र एकर मंदिरांच्या जमिनीचे सातबाऱ्यावरील नाव शासनाने मंदिर विश्वस्तांना विश्वासात न घेता परस्पर शासनाच्या नावे सातबारा केलेला आहे ; आमची मागणी आहे की ताबडतोब त्या जमिनी देवस्थानाच्या नावावर करण्यात याव्यात. श्रीराम मंदिर झाल्यानंतर काशी मथुरेसह देशभरातली साडेचार लाख मंदिरे मुक्त करने हे आपले ध्येय आहे. मंदिर महासंघाच्या माध्यमातून मंदिर सुव्यवस्थापन, मंदिर संघटन, मंदिर समन्वय , मंदिर सुरक्षा, सुनियोजन आणि मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे आवश्यक आहे. यासाठी मंदिरे ही सनातन धर्म प्रचाराची केंद्र होणे गरजेचे असून यासाठी *१५,०००* मंदिरांचे संघटन झालेले आहे.

या संघटनाच्या माध्यमातून मंदिरांच्या समस्या सोडवण्याचा आणि मंदिर महासंघाला अधिकृत संघटना म्हणून घोषित करावे ही मागणी यावेळी सरकारकडे करण्यात येत आहे.अधिवेशनामध्ये मठ मंदिराचे विश्वस्त, पुजारी, प्रतिनिधी ४५० हुन अधिक जण उस्फूर्तपणे सहभागी झाले होते.

## वीज थकबाकी २४८ कोटी, वसूली केवळ २९ कोटी ; काय आहे 'मिशन २१ डे'?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती :–** वापरलेल्या विजेचे पैसे वेळेवर भरण्यास ग्राहकांकडून टाळाटाळ होत असल्याने महावितरणच्या अमरावती परिमंडळाची एकूण थकबाकी २४८ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. तथापि, या आर्थिक वर्षातील मार्च हा शेवटचा महिना असूनही गेल्या ९ दिवसात फक्त २९ कोटी रूपयेच वसूल झाले आहे. त्यामुळे उर्वरित थकबाकी वसुलीकरीता परिमंडळात 'मिशन २१ डे' ला सुरूवात करण्यात आली असून मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात विभाग निहाय उद्दिष्ट ठरवून देण्यात आले असून क्षेत्रीय पातळीवर होणाऱ्या कारवाईचा दररोज आढावा घेण्यात येत आहे.

अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्या अंतर्गत घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडील २१९ कोटी रूपयाच्या वीज देयकाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी 'मिशन २१ डे' अंतर्गत 'थकित वीज बिल भरा अथवा वीज पुरवठा खंडित' ही मोहीम तीव्र करण्यात आली आहे.

३१ मार्च पर्यंत २१९ कोटी रूपये वसूल करण्यासाठी दरदिवशी अंदाजे १० कोटी रूपये वसुल करावे लागणार आहेत. त्यामुळे वीजबिल भरण्याला प्रतिसाद न देणाऱ्या ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित होणार आहे. संपूर्ण वीजबिल आणि पुन जोंडणी शुल्क (सिंगल फेज ग्राहक ३१० रूपये आणि ३ फेज ग्राहक ५२० रूपये अधिक जी.एस.टी.) भरल्याशिवाय त्या ग्राहकाचा वीज पुरवठा सुरु न करण्याचे निर्देश मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी दिले आहेत.



'मिशन २१ डे' अंतर्गत अमरावती जिल्ह्यातून १०३ कोटी रुपये आणि यवतमाळ जिल्ह्यातून ११५ कोटी रूपये इतक्या थकबाकीची वसुली करावी लागणार आहे.


त्यासाठी मुख्य अभियंत्यासोबत अधीक्षक अभियंता अमरावती दीपक देवहाते आणि अधीक्षक अभियंता यवतमाळ प्रवीण दरोली ठिक–ठिकाणी अधिकारी–कर्मचाऱ्यांसोबत वसुली मोहिमेत सहभागी होत आहेत.

# १० लाख रुपये नही तो गोलीयों से भून डालूंगा !

### व्यापाऱ्याला धमकी, राजवीर संघटनेच्या रम्मूविरूध्द गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** जमील कॉलनी येथील व्यावसायिक तथा समाजसेवक हाजी इरफान यांना १० लाख रुपये दिले नाही तर गोलीयों से भून डालूंगा तसेच परिवारातील सर्वांना संपवून टाकण्याची धमकी दिल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी उघडकीस आली. याघटनेत नागपुरी गेट पोलिसांनी हाजी इरफान खान उस्मान खान (वय ४९ रा. जमिलउर्फ रहमत खान बिसमिल्ला खान (रा. चिलमछावणी) याचयाविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल केला. तो राजवीर संघटनेचा अध्यक्ष आहे.रम्मू उर्फ रहमत खान हा स्वतःला तो सामाजिक कार्यकर्ता म्हणवून सरकारी अधिकाऱ्यांना धमकावितो. आठ महिन्यांपूर्वी रम्मूने हाजी इरफान यांना फोन करून पैशाची मागणी केली होती. त्यांनी त्यांच्या मित्रांसमोर रम्मूला ५० हजार रुपये दिले होते.त्यानंतर काही महिने त्याने पैशाची मागणी केली नाही. परंतु ४ मार्चला रम्मूने हाजी इरफानला फोन केला आणि १० लाख रुपयांची खंडणी मागितली.



## जिल्ह्यात आतापर्यंत जवळपास साडेसात लाख क्विंटल कापसाची विक्री

### शेतकऱ्यांकडील ६५ टक्के कापसाची विक्री झाली मात्र भाव वाढलेच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती –** खरिपातील मुख्य पीक असलेल्या कापसाची आतापर्यंत सुमारे साडेसात लाख क्विंटलची शेतकऱ्यांनी विक्री केली आहे. यंदा जिल्ह्यात पिकलेल्या एकूण कापसापैकी जवळपास ६५ ते ७० टक्के कापूस शेतकऱ्यांनी विकल्याचा अंदाज या क्षेत्रातील तज्ज्ञांनी वर्तवला आहे. मात्र तरीही कापसाचे दर वाढले नाही.

शेतकऱ्याचा कापूस बाजारात आल्यापासून खासगी बाजारात अजूनही कापूस प्रतिक्विंटल ७ हजार ते ७५०० रुपयांच्या वर गेलेला नाही. शुक्रवारी येथील खासगी बाजारात कापसाला प्रतिक्विंटल ७ हजार २०० सर्वाधिक भाव मिळाला.

'वऱ्हाड म्हणजे पांढऱ्या सोन्याची कुऱ्हाड' अशी म्हण कधीकाळी प्रचलीत होती. आता मात्र असे काहीही उरले नाही. पूर्वी मोठ्या प्रमाणात विदर्भात कापसाचे उत्पादन व्हायचे आता मात्र उत्पादन झाले तरीही भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांना कापूस लावायचा की नाही, असा प्रश्न पडलेला आहे. कारण सहा महिनेकिंवा त्यापेक्षा जास्त दिवस चालणारे पीक म्हणजे कपाशी आहे. इतर पिकांच्या तुलनेत कापसाचा मशागत खर्च दुप्पट आहे, मनुष्यबळाचे अंवलंबित्वही भरपूर आहे. मात्र त्या तुलनेत कपाशीमधून शेतकऱ्यांना आता उत्पन्न मिळत नाही, ही वास्तविकता आहे.कारण चार वर्षांपूर्वी अमरावतीतच कापसाला प्रतिक्विंटल १२ ते १३ हजार रुपयांचा भाव मिळाला होता. त्यानंतर ९ हजार रुपये भाव कितीतरी महिने शेतकऱ्यांना मिळाला होता. मात्र यावर्षी शेतकऱ्यांचा कापूस निघाल्यानंतर सुरुवातीपासूनच कापसाचे भाव सात हजार पाचशे रुपयांवर गेले नाही.शेतकऱ्यांना मार्च महिन्यात भाववाढीची अपेक्षा होती मात्र आता मार्च महिन्यातील पहिला आठवडा संपला तरीही भाव वाढले नाही. भाववाढीच्या प्रतीक्षेत अर्धाहून अधिक कापसाची विक्री शेतकऱ्यांनी केली आहे



# वाहन खरेदी केले २०२३ ला दंड वसुल केला २०१९ च्या प्रकरणात

## परीवहन विभाग व वाहतुक विभागाचा भोंगळ कारभार,वाहन मालकाची न्यायालयात धाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०चांदूरबाजार**

अमरावती प्रादेशिक परिवहन विभागाच्या कामकाजातील हलगर्जीपणा आणि तांत्रिक गोंधळामुळे चांदूर बाजार येथील वाहनधारकाला नाहक त्रास सहन करावा लागला. २०२३ मध्ये खरेदी केलेल्या वाहनाला २०१९ साली वाहतूक उल्लंघनाचा ठपका ठेवत दंड भरण्याची नोटीस पाठवण्यात आली. वाहतूक पोलिसानेसुद्धा तो दंड भरून घेतल्याने वाहनधारक चक्रावून गेला आहे चांदूर बाजार शहरातील पंकज मिश्रा या नागरिकाने २६ ऑगस्ट २०२३ मध्ये नवी चारचाकी खरेदी केली. सर्व कागदपत्रे व्यवस्थित असून, कोणताही गुन्हा किंवा दंडप्रकरण नाही. मात्र, अचानक त्यांना




आरटीओकडून एक नोटीस मिळाली. या नोटीसनुसार, चार चाकीने ३ नोव्हेंबर २०१९ मध्ये वाशिम जिल्ह्यातील कारंजा शहरात वाहतुकीचे नियम तोडले आणि त्यासाठी दंड प्रलंबित आहे. ही नोटीस पाहून वाहनधारकाला धक्का बसला. कारण त्या चारचाकीचे उत्पादनच २०२३ मधील आहे. तरीही परिवहन विभागाच्या वसुलीकरिता अरेरावीमुळे चांदूर बाजार येथील वाहनधारकाला त्याच्या वाहनावर आकारलेला दंडाचा भरणा करावा लागला.सदर प्रकरणाची तक्रार आरटीओविभागा कडे करणार अशी माहिती पंकज मिश्रा यांनी वृत्तप्रतिनिधीला दिली.

### त्याच चारचाकी क्रमांकाची दुचाकी कशी?

दंडाचा भरणा केल्यानंतर पंकज मिश्रा यांनी त्यांना झालेल्या दंडाबाबत चौकशी केली. त्यावेळी त्याच क्रमांकाच्या दुचाकीवर दंड असल्याचे आढळून आले. त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या वाहनाची आरसी वाहतूक पोलिसाला दाखविली. तरीही त्यांना दंड भरण्याची सक्ती केली.

### दंड भरल्यानंतरही नोटीस

वाहनचालकाने जो गुन्हा केलाच नाही, त्याचा दंड आरटीओने वसूल केला. यावर प्रकरण थांबले नसून, दंडाचा भरणा केल्यावरही त्या वाहनधारकाला पुन्हा नोटीस बजावण्यात आली. यामुळे परिवहन विभागातून नाहक त्रास तर दिला जात नाही ना, अशी शंका पंकज मिश्रा यांनी व्यक्त केली आहे.

### पंकज मिश्रा न्यायालयात दाद मागणार

वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिक आधीच त्रस्त आहेत. जुन्या वाहनांची माहिती नव्या वाहनांवर चुकीने लिंक होण्याचे प्रकार यापूर्वीही समोर आले आहेत. मात्र, त्यावर ठोस उपाय न झाल्याने अशा घटना पुन्हा पुन्हा घडत आहेत.जो गुन्हा केलाच नाही त्याचा दंड भरुनही पुन्हा नोटीस मिळाल्यामुळे त्रस्त वाहनधारक न्यायालयात दाद मागणार असल्याची माहीती पंकज मिश्रा यांनी दिली.

# उपअभियंता, चार कनिष्ठ अभियंत्यांना शो कॉज

## पाणीटंचाई आढावा बैठकीला उशिरा येणे भोवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०चिखलदरा**

चिखलदरा येथे पाणीटंचाईआढावा व उपाययोजना यांच्या अनुषंगाने ७ मार्च रोजी आयोजित बैठकीला उशिरा येणाऱ्या व गैरहजर उपअभियंता तसेच चार कनिष्ठ अभियंता यांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी शो कॉज नोटीस बजावली. बैठकीला 'ऑन टाईम' पोहोचलेल्या सीईओंनी ही शो कॉज नोटीस 'ऑन द स्पॉट' बजावली.

चिखलदरा येथील आरोग्य प्रशिक्षणकेंद्रात शुक्रवारी सकाळी ११ वाजता पाणीटंचाईबाबत बैठक झाली. तशी पूर्वसूचना चिखलदरा पाणीपुरवठा उपविभागाच्या उपअभियंत्यांना देण्यात आली होती. त्यामुळे नियोजित वेळेत त्यांनी व अधिनस्त कनिष्ठ अभियंत्यांनी बैठकीस उपस्थित राहणे अपेक्षित होते. परंतु, उपअभियंता सतीश खाटकर हे बैठक सुरू झाल्यानंतर आले. सीईओंनी याबाबत जाब विचारत उपअभियंता खाटकर यांना शो कॉज नोटीस बजावली. कनिष्ठ अभियंता भीमराव बंडगर यांनाही बैठकीला उशीर केल्याबद्दल शो कॉज नोटीस बजाविली. बैठकीस वेळेवर का उपस्थित झाले नाहीत, याबाबत खुलासा त्यांना सादर करायचा आहे.






### तीन कनिष्ठ अभियंत्यांची बैठकीला दांडी

बैठकीला पाणीपुरवठा विभागाचे स्थानिक तीन कनिष्ठ अभियंता गैरहजर असल्याची बाब सीईओ संजीता महापात्र यांच्या निर्देशनास आली. त्यामुळे सभेला दांडी मारणारे कनिष्ठ अभियंता राहुल लटपटे, विशाल ठाकरे आणि संघर्ष घडेकर अशा तीन कनिष्ठ अभियंत्यानाही सीईओंनी कारणे दाखल नोटीस बजावली आणि खुलासा सादर करण्यास सांगितले आहे. यामुळे जि. प. वर्तुळात खळबळ उडाली आहे.

### सीईओंकडून गंभीर दखल मेळघाटात पाणीटंचाई

पाणीटंचाईसारखा संवेदनशील विषय आणि वरिष्ठांच्या सूचना गांभीर्याने घेत नसल्याचे निर्दशनास आले. ही बाब प्रशासकीयदृष्ट्या गंभीर असून ते प्रशासकीय व शिस्तभंगाची कार्यवाहीस पात्र असल्याचे सीईओ संजीता महापात्र यांनी शुक्रवारी जारी केलेल्या नोटीसमध्ये नमूद आहे. मेळघाटातील चिखलदरा व धारणी तालुक्यातील पाणीटंचाईचा मुद्दा सीईओंनी गांभिर्याने घेतला आहे.

# चाकूचा धाक दाखवून स्टोन क्रशरच्या दिवानजी जवळील तीन लाख रुपयांचा ऐवज लुटला

## स्टोन क्रशरवरील मजुरांच्या चुकाऱ्याचे २ लाख ८८ हजार लुटले स्थानिक पोलीस गुन्हे शाखेसह दत्तापुर पोलीस आरोपींच्या शोधात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०धा.रेल्वे**

चाकूचा धाक दाखवून स्टोन क्रशरच्या दिवानजीच्या जवळील तीन लाख रुपयांची रक्कम लुटली.दिवानजीची दुचाकी,दोन स्मार्ट मोबाईल घेवून धूम ठोकल्याचीच घटना रविवारला (ता.९) सकाळी ८ वाजताच्या सुमारास घडली.ही घटना रामगाव गावाजवळ घडली.या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.दरम्यान दत्तापुर पोलीस ठाण्यात या घटनेची फिर्याद देण्यात आली आहे.स्थानिक पोलीस गुन्हे शाखेसह दत्तापुर पोलीस आरोपींच्या शोध घेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार असे की,निलेश शेषराव चाफले (४५) रा.श्री स्वामी समर्थ नगर, जुना धामणगाव हे साई स्टोन क्रेशर येथे दिवानजी म्हणून गेल्या पाच वर्षांपासून काम पाहत आहे.रविवारला (ता.९) सकाळी ७.४५ वाजता साई स्टोन क्रेशर येथे मजुराचा पगार असल्याने हे घरुन रामगाव रोडने दुचाकी क्र.एम.एच.२७-एझेड ८०३० ने हिरव्या रंगाच्या कापडी पिशवीमध्ये २ लाख ८८ हजार रुपये,हिशोबाचे चार रजिस्टर असलेली बॅग घेवुन साई स्टोन क्रेशर रामगाव येथे निघालो असता अंदाजे ८ वाजताच्या सुमारास रामगाव रस्त्याने जात असता बाळासाहेब तुपसुंदरे यांचे शेताजवळ एका पेंशन प्रो काळ्या रंगाचे मोटर सायकलवर दोन ईसम मागे येवुन त्यांची मोटर सायकल निलेश चाफले गाडीचे समोर आडवी लावली.त्या मोटर सायकलवर असलेल्या दोन इसमापैकी एका इसमांनी त्यांचे मोटर सायकलवरुन उतरुन मला चाकुचा धाक दाखवुन हिरव्या रंगाच्या कापडी पिशवी मधील २ लाख ८८ हजार रुपये,हिशोबाचे चार रजिस्टर असलेली बॅग जबरीने हिसकावुन घेवून मला ढकलुन दिले.त्यामुळे निलेश चाफले खाली पडले व त्यांनी आरडाओरडा केली असता तेथील बाजुच्या शेतात काम करीत असलेला राहुल गौतम बन्सोड रा.रामगाव हे धावत आला तेव्हा त्या दोघांनी त्यांची दुचाकी व निलेश चाफले यांची दुचाकी घेवुन पळुन गेले. त्या नंतर निलेश चाफले यांनी राहुल गौतम बन्सोड यांच्या दुचाकीने त्या दोघांचे पाठीमागे गेले असता तर निलेश चाफले यांची दुचाकी तेथुन थोड्या अंतरावर रामगाव ते धामणगाव रोडवर स्मशान भुमी जवळ मोटरसायकल टाकुन दिलेली दिसली. व ते दोन्ही इसम त्यांचे मोटर सायकलवर बसुन धामणगाव रेल्वे कडे पळुन गेले.२ लाख ८८ हजार रोख रक्कम,१४ हजार रुपयांचे दोन मोबाईल असा एकंदरीत ३ लाख २ दोन हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने हिसकावुन नेला.या घटनेची फिर्याद दत्तापुर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून त्या दोन अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी घटना स्थळाचा पंचनामा केला आहे.अधिक तपास ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या नेतृत्वाखाली पोलीस करीत आहे.



**चोरट्यांनी मोबाईल महीमापुर गावाजवळ फेकले**

निलेश चाफले यांच्या जवळील मोबाईल तालुक्यातील माहिमापुर येथील उर्ध्व वर्धाच्या कालव्याजवळ फेकले होते.पोलिसांनी तांत्रिक आधारावर मोबाईलचे लोकेशन मिळविले.अज्ञात चोरट्यांचे वर्णन पुढील प्रमाणे आहे.एक इसम ज्याचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष ग्रे रंगाचे फुलबायाचे शर्ट व निळसर रंगाचा जिन्स पॅट दुस-या इसमाचे वर्णन ज्याचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष कथ्या रंगाचे फुलबाहयाचे चेक चे शर्ट, फीक्का निळसर रंगाचा जिन्स पेंट असे वर्णन असलेले होते.

# उद्याला जळगाव आर्वीत दिंडी महोत्सव : संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सव

## ७० दिंड्या होणार सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०धा.रेल्वे**

मागील सात दिवसापासून सुरू असलेल्या संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सवाच्या उद्या शेवटच्या दिवशी सायंकाळी दिंडी महोत्सव आयोजित केला असून विदर्भातील ७० दिंड्या सहभागी होणार आहे.संत लहरीबाबांचा जन्म विदर्भातील अकोला जिल्ह्यातील श्रीक्षेत्र मधापुरी येथे झाला असला तरी विदर्भाच्या कानाकोपऱ्यात फिरवून त्यांनी आध्यात्मीक विचार लोकापर्यंत पोहचविले. सन १९३२ मध्ये शिवरामजी व आई झिबाबाई दहीकर यांच्या उदरी या अवलीया संत जन्माला आला. त्याचे नाव भिमराव होते.गावोगावी फिरत असतांना ते धामणगाव देव येथील संत मुंगसाजी महाराजा जवळ गेले.महाराजांनी त्यांची ओळख माझा मुगंशा अशी करून दिली.ही माहिती मधापुरी गावात पोहचल्या नंतर त्यांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होवू लागली. एक दिवस महाराज कुरूम रेल्वे स्थानकावरून रेल्वेत बसून कुठेतरी निघून गेले. त्यांचा ग्रामवासीयांनी खुप शोध घेतला. परंतू ते कोणालाही मिळाले नाही.त्यानंतर अनेक वर्षा नंतर अमरावती येथील बजाज धर्मशाळे जवळ अचानक महाराज प्रगट झाले. त्यांच्या आत्मनंदलहरीपणामुळे त्यांचे नाव लहरी बाबा असे पडले.

धामणगाव तालुक्याशी त्यांचा जवळचा संबध ते ४३वर्षा पूर्वी जळगाव आर्वी येथे आलेत एका ठिकाणी गावातील मारोती मंदिराच्या बाजुला बसून आपले अध्यात्मीक विचार ग्रामस्थाना पटवून देण्यास सुरूवात केली. त्याकाळात गावात मोठा दुष्काळ होता.ग्रामस्थांनी या दुष्काळाशी सामना करण्याचे विचार त्यांनी आपल्या अमृतवाणीतून मांडले. गावातील भाविकांचे श्रध्दास्थान झालेल्या लहरी बाबाचे छोटेसे मंदिर ग्रामस्थांनी बांधले.तदनंतर गावातील भाविकांनी मोठे मंदिर बांधण्याचा संकल्प केला. ज्या ठिकाणी लहरी बाबा विराजमान झाले होते.त्यावेळी पाच फुटावर खोदून सोडलेल्या विहीरीला पाणी लागलेत तदनंतर भव्य मंदिर उभारण्यात आले.



आज या मंदिरात राजस्थान येथून आणलेली मोठी लहरी बाबांची मुर्ती विराजमान झाली आहेत. डाव्या बाजुला पांडुरंग, दुर्गा देवी, दत्तात्रय यांची मुर्ती तर दुसऱ्या बाजुला राम, राधा, कृष्ण, गणपती, यांची मुर्ती आहेतलहरी बाबा यांच्या मुर्तीच्या बाजुला संत गजानन महाराज व संत साईबाबा यांच्या मुर्ती विराजमान आहेत.प्रत्येक संताची जयंती या मंदिरात साजरी करण्यात येते.तर एकादशीला भजन आयोजीत केल्या जाते. हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले संत लहरीबाबा यांच्या पुण्यतिथी महोत्सव दरवर्षी भाविक साजरे करतात.

उद्याला घराघरात होणार दिवाळी साजरीमागील सात दिवसांपासून जळगाव आर्वी येथे संत लहरीबाबा पुण्यतिथी महोत्सव साजरा करण्यात येत आहे.ह भ प वासुदेव महाराज सुपलकर यांचे दररोज सकाळी व दुपारी झालेल्या भागवत कथेचा लाभ परिसरातील ग्रामस्थांनी घेतला तर रात्रीला अनेक संताचे किर्तन झाले. उद्या सकाळी साडेसात वाजता ग्रामस्थांच्या समक्ष होम पुजेला सुरूवात होणार आहे. तत्पुर्वी पहाटे चार वाजता ग्रामस्थ गावाची पूर्ण ग्रामस्वच्छता करणार असून संत लहरीबाबा यांच्या प्रत्यक्ष आगमनाची प्रार्थना पाच वाजता करणार आहे.उद्या या गावात घरोघरी सकाळी व सायंकाळी दिवे लावण्यात येणार आहे.

**७० दिंड्या सहभागी होणार**

सायंकाळी संत लहरीबाबा यांची प्रतिमा ठेवलेली रथयात्रा सात वाजता निघणार असून तालुक्यातील ७० दिंड्या या रथ यात्रेत सहभागी होणार आहे. विशेषत: दिंडी महोत्सव गावातील प्रमुख मार्गावरून परिभ्रमन करणार असून यात संपूर्ण ग्रामस्थ सहभागी होणार आहे.

# मीही आईबरोबर गंगा स्नानाला गेलेलो, आजवर साधी खाजही आली नाही, मग यांना... राज ठाकरेंना नितेश राणेंचा सवाल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

गंगा नदीत हजारो लोकांनी आंघोळी केल्यामुळे ते पाणी पिण्यास झिडकारणारे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर आता भाजप नेतेही तुटून पडले आहेत. मत्स्यपालन मंत्री नितेश राणे यांनी 'मला तर कुठली खाज आली नाही' अशा शब्दात राज ठाकरेंना सुनावलं, तर बाळा नांदगावकर आणि राज ठाकरे यांचंच पटत नाही, असा दावा सुधीर मुनगंटीवार यांनी केला.

तो आमच्या आस्था आणि श्रद्धेचा विषय आहे. मी स्वतः माझ्या आईबरोबर महाकुंभला जाऊन आलो आहे, गंगा स्नान केलं आहे. मला तर आजपर्यंत साधी खाजही आली नाही. ना माझ्यासोबत असलेल्या लोकांना कुठला त्रास झाला. मग त्यांना कुठले चार पाच लोक भेटले, हा विषय विचारायला पाहिजे ना? असं नितेश राणे म्हणाले.

हाच मुद्दा, बकरी ईदच्या वेळेला. जेव्हा बकरी कापून घाण पाणी सोडलं जातं, तेव्हा कोण विचारत नाही. मोहम्मद अली रोडला जाऊन बघा, रात्री काय धिंगाणा टाकला जातो, सगळं खाऊन पिऊन घाण खाली टाकली जाते. तेव्हा कोण विचारत नाही, असंही राणे म्हणाले.

## शेतकऱ्यांसह महाराष्ट्राच्या सामान्य जनतेच्या अपेक्षाभंग

शिळ्या कढीला उत आणण्याचा प्रकार महायुती सरकारने केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारकाचं काय झालं हे शासन सांगणार आहे का ? तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमीवरील नियोजित आंतरराष्ट्रीय स्मारकाचं काम कधी पूर्ण होणार, त्याला नक्की किती निधी देणार आहात, याविषयी सरकारकडून कुठलीही माहिती देण्यात आली नाही.आज नवीन स्मारकांची घोषणा करून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न अजितदादांनी केला आहे. लाडक्या बहिणींच्या तोंडाला पानं पुसण्याचं काम सरकारने आज केलं. आहे त्या योजनेसाठी पुरेसा नियतव्यय नाही, उलट लाभार्थ्यांची संख्या कमी करण्याचा डाव या अर्थसंकल्पात दिसतो. पायाभूत सुविधांबाबत सरकारचा सगळा भर मुंबई-पुण्यावर दिसतो. बाकीचा महाराष्ट्र या सरकारच्या लेखी अस्तित्वात नाही का ? ज्या महामार्गांबाबत अर्थसंकल्पात बोललं गेलंय ते प्रकल्प भू-माफियांचे खिसे भरण्यासाठी राबवले जात आहेत. कुठलीही दिशा नसलेला कॉपीपेस्ट अर्थसंकल्प आहे.विधानसभा निवडणुकीत महायुतीनं शेतकऱ्यांना कर्जमाफीचं आश्वासन दिलं होतं. शिवाय वीजबील माफीही करणार होते.त्यामुळं राज्यातील बळीराजा या बजेटकडं आस लावून बसला होता. मात्र, शेतकऱ्यांसह महाराष्ट्राच्या सामान्य जनतेचा अपेक्षाभंग झालाय...



**ॲड. यशोमती ठाकूरमाजी आमदार**

## पोकळ घोषणांचा पाऊस

राज्याचा अर्थसंकल्प आज सादर झाला या बजेटवर अमरावतीचे कॉंग्रेस पक्षाचे खासदार बळवंत वानखडे यांनी सडकून टीका केली,शेतकऱ्यांची कर्जमाफीची घोषणा होईल असं वाटलं होतं. लाडक्या बहिणींना २१०० रुपये मिळेल असं वाटलं होतं फार मोठा घोषणा होतील असं वाटतं मात्र केवळ पोकळ घोषणाचा पाऊस पडून निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही अशी टीका खासदार बळवंत वानखडे यांनी केली, सर्वसामान्य जनतेच्या तोंडाला पाणी पुसणार हे बजेट आहे उद्योग धंद्याबाबत सुद्धा आस्था दिसत नाही त्यामुळे हे बजेट नाकामयाब आहे अशी टीका खासदार वानखडे यांनी केली.



## सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर महाराष्ट्राच्या नवनिर्माणाला दिशा देणारा अर्थसंकल्प

महाराष्ट्र २०२५-२६ चा अर्थसंकल्प हा समाजातील शेवटच्या घटकाला न्याय देण्याच्या संकल्पातून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा. अजितदादा पवार यांनी आज विधानसभेत सादर केलेला अकरावा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारा हा अर्थसंकल्प शेती, ग्रामविकास, महिला सशक्तीकरण, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना देणारा व इतरही महत्त्वाच्या बाबींना दिलेले स्थान महायुती सरकारची सर्वांगीन विकासाची कटिब्धता दर्शविते.सर्वसमावेशी आणि दूरदर्शी अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मुख्यमंत्री ना श्री देवेंद्रजी फडणवीस , उपमुख्यमंत्री ना श्री एकनाथ शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे अभिनंदन !



**चेतन गावंडे, माजी महापौर, अमरावती**

## विकसित भारत-विकसित महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प - प्रविण पोटे पाटील

मा. ना. श्री. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या कुशल नेतृत्त्वात राज्याचा अर्थसंकल्प २०२५ मा.ना.श्री. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सादर केला यात शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, मत्स्य व्यवसाय व बंदरे, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा' चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. आज जाहीर झालेल्या योजना व तरतुदी राज्याच्या भविष्यकालीन अर्थव्यवस्थेला व विकासाला बळकटी देणारा आहे.या अर्थसंकल्पामुळे राज्याचा विकासाला नवी गती मिळेल हे निश्चितपणे सांगतो.

